www.taxguru.in

विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,
८वा मजला, विक्रीकर भवन,
माझगाव, मुंबई.

## -: व्यापारी परिपत्रक :-

क्र.: विसआ(मुख्या-२)/सा.प्रो.यो.-४६/२०१३/............... मुंबई दि. २९/०९/२०१६
परिपत्रक क्र.: 29T of 2016

विषय: महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांसाठी विशेष अभय योजना (Special Amnesty Scheme).

संदर्भ:

१) शासन निर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र. ५१/१३/उद्योग-१० मुंबई-३२ दि. २ मे २०१३
२) शासन निर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र. ५१/१३/उद्योग-१० मुंबई-३२ दि. १ जुलै २०१३
३) शासन निर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र. ५१/१३/उद्योग-१० मुंबई-३२ दि. १ ऑगस्ट २०१३
४) परिपत्रक क्र. उसं. /आऊक/विशेष अभय योजना-२०१३-१४/कार्यपद्धती / २०१३/बी-१८०९४, दि. ०७/१२/२०१३.
५) शासन निर्णय क्र. एस.आय.सी.२०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१० मुंबई-३२ दि. १४ ऑगस्ट २०१४
६) क्र. विसआ(मुख्या-२)/पी.एस.आय-४६/२०१३/मुंबई, परिपत्रक क्र. 3T दि. २४.०१.२०१४
७) क्र.: विसआ(मुख्या-२)/सा.प्रो.यो.- ४६ /२०१३/ मुंबई दि. ११.११.२०१४, परिपत्रक क्र. १९टी दि. ११.११.२०१४
८) शासन निर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र. ५१/१३/उद्योग-१०, मुंबई-३२ दि. ६मे, २०१६

वरील संदर्भाधीन शासन निर्णय व परिपत्रक क्र. १ ते ७ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकां- साठी विशेष अभय योजना जाहीर करण्यात आली होती. सदर अभय योजनेचा कालावधी दि. ३१.०३.२०१५ पर्यंत होता.

शासन निर्णय क्र. एस.आय.सी. २०१३/प्र.क्र. ५१/१३/उद्योग-१०, मुंबई-३२ दि. ६मे, २०१६ नुसार सदर विशेष अभय योजनेला दि. १.०४.२०१६ ते ३१.०३.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विभागीय कार्यालयाकडून व व्यापाऱ्यांकडून या योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात आलेल्या विचारणा व शासन निर्णय दि. ०७.१२.२०१३ व दि. ०६.०५.२०१६ च्या अनुषंगाने आणि दि. २४.०१.२०१४ व दि. ११.११.२०१४ च्या परिपत्रकात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण/ सुधारणा करण्यात येत आहेत.

**उद्योग संचलनालयामार्फत निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र. उसं. /आऊक/विशेष अभय योजना-२०१३-१४/कार्यपद्धती / २०१३/बी-१८०९४, दि. ०७/१२/२०१३ च्या परिपत्रकाशी संबंधित मुद्दे व त्यावरील स्पष्टीकरण खालीलप्रमाणे : -**

**मुद्दा क्रमांक ३.१ :-** पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या व बंद घटकांचे दि. ३१.०३.२०१४ पर्यंत विहित नमुन्यात (परिशिष्ट-१) सहपत्रांसह (परिशिष्ट २ ते ७) प्राप्त झालेल्या अर्जावर संबंधित अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावयाची आहे.

**स्पष्टीकरण :-** शासन निर्णय दि. ७-१२-१३ नुसार विहित केलेल्या अंमलबजावणी अधिका-याकडे संबंधित पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या व बंद असलेल्या घटकाने दि. ३१-०३-२०१७ पर्यंत अर्ज करावा.

**मुद्दा क्रमांक ३.५ :-** संबंधित शासकीय विभाग/ कार्यालय/उपक्रम/यंत्रणा यांनी थकीत देणे रकमेच्या मुद्दलाची एकरकमी वसूली करावयाची असून वसूली झाल्यानंतर अंमलबजावणी अधिकाऱ्यांना वसूल केलेल्या मुद्दलाची रक्कम व तारीख त्वरीत कळवावयाची आहे.

**स्पष्टीकरण :-** उद्योग सहसंचालक, (सामुहिक प्रोत्साहन योजना) उद्योग विभाग यांचे कार्यालयाशी झालेल्या चर्चेनुसार एकरकमी याचा अर्थ एकरकमी अथवा टप्प्याटप्प्याने विहित मुदतीपर्यंत सदर रकमेचा भरणा संबंधित घटकाने करावा.

मुद्दा क्रमांक ३.३ नुसार परिशिष्ट ६ मधील मंजुरीपत्र संबंधित विभागास म्हणजे विक्रीकर विभागास प्राप्त झाल्यानंतर विक्रीकर विभागाच्या संबंधित अधिका-याने शासकीय देण्याचा प्रकार, देणे असलेल्या रकमेचे मुद्दल, व्याज व दंडव्याज याबाबतची माहिती अंमलबजावणी अधिकारी, लाभार्थी घटक व बंद उद्योगाची मालमत्ता/व्यवस्थापन स्विकारणा-या व्यवस्थापनास कळवायची आहे.

**स्पष्टीकरण :-** याबाबत असे कळविणेत येते की, परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ३.३ नुसार विक्रीकर विभागाने मंजुरीपत्र (परिशिष्ट-६) प्राप्त झालेल्या दिनांकापासुन जास्तीत जास्त ३० दिवसात शासकीय देण्याचा प्रकार, देणे असलेल्या रकमेचे मुद्दल, व्याज व दंड याबाबतची माहिती अंमलबजावणी अधिकारी, लाभार्थी घटक व बंद उद्योगाची मालमत्ता/व्यवस्थापन स्विकारणा-या व्यवस्थापनास कळवावी.

**मुद्दा क्रमांक ३.६:-** संबंधित शासकीय विभाग/कार्यालय/उपक्रम/यंत्रणा यांनी शासकीय थकबाकीच्या मुद्दलाची रक्कम कळविल्या नंतर तीन महिन्यामध्ये सदर मुद्दलाच्या रकमेची परतफेड बंद लाभार्थी घटकांच्या व्यवस्थापनाने करावयाची आहे. अन्यथा अशा घटकांना गुणवत्तेच्या आधारे अंमलबजावणी अधिका-यांकडुन प्रत्येकी एक महिन्याकरता दोन मुदतवाढी प्राप्त करुन घेता येतील.

**स्पष्टीकरण :** - याबाबत असे कळविणेत येते की वर नमुद केल्याप्रमाणे विक्रीकर विभागाने बंद लाभार्थी घटकास शासकीय देण्याचा प्रकार, देणे असलेल्या रकमेचे मुद्दल, व्याज व दंड याबाबतची माहिती कळविलेल्या तारखेपासून तीन महिन्याची समय मर्यादा मोजण्यात यावी व सदर मुदतीत व्यापाऱ्याने मूळ कराच्या रकमेचा भरणा न केल्यास अर्ज निकाली काढण्यापुर्वी सदर रकमेचा भरणा करण्यासाठी अंमलबजावणी अधिकाऱ्याने मुदतवाढ मंजूर केली आहे किंवा कसे याबाबत खातरजमा करावी.

**शासन निर्णय दि. ०६.०५.२०१६ व व्यापारी परिपत्रक दि.२४.०१.२०१४ आणि दि. ११.११.२०१४ शी संबंधित मुद्दे व त्यावरील स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.**

**परिच्छेद क्र.५:**

मुंबई विभागामध्ये विक्रीकर सहआयुक्त [मुंबई विक्रीकर कायदा] व विक्रीकर सहआयुक्त (नोडल) मुल्यवर्धित कर कायदा या दोन्ही कायद्यांसंदर्भात थकबाकी प्रलंबित असल्यास, अभय योजनेच्या लाभार्थी उद्योग घटकाने कुठे अर्ज करावा याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

मुंबई विक्रीकर कायदा व मुल्यवर्धित कर कायदा या दोन्ही कायद्याअंतर्गत थकबाकी प्रलंबित असेल तर ज्या कायद्याखाली थकबाकीचा कालावधी जास्त असेल त्या कायद्याशी संबंधित विभागाकडे अर्ज करावा. मुल्यवर्धित कर कायद्याखाली थकबाकीचा कालावधी जास्त असेल तर सदर अर्ज संबंधित विक्रीकर सहआयुक्त (नोडल /मो. क. क.) यांचेकडे करावा.

मुंबई व्यतिरीक्त उर्वरीत ठिकाणी संबंधित विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) यांचेकडे अर्ज करावा.

**परिच्छेद क्र.** ७.

१) अभय योजनेचा सुधारीत कालावधी दि. ०१.०४.२०१६ ते दि. ३१.०३.२०१७ असा राहील.

२) अभय योजनेसाठी संबंधित घटकाने करावयाच्या मुद्दलाच्या रकमेचा भरणा करण्याबाबत शासनाच्या उपरोल्लेखित दि. ०७.१२.२०१३ च्या परिपत्रकाच्या (वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह) अटी लागू राहतील.

वरील सुधारणांव्यतिरिक्त दि. २४.०१.२०१४ आणि दि. ११.११.२०१४ च्या परिपत्रकातील इतर सुचना व अटी कायम आहेत.

दि. २०/०९/२०१६ .

ठिकाण: मुंबई

विक्रीकर आयुक्त,

महाराष्ट्र राज्य, मुंबई

क्र.: विसआ(मुख्या-२)/सा.प्रो.यो.-४६/२०१३/ ....... मुंबई दि. २०/०९/२०१६ .

परिपत्रक क्र.: 29T of 2016

प्रत रवाना :-

१) महाराष्ट्र राज्यातील सर्व अपर विक्रीकर आयुक्त.
२) महाराष्ट्र राज्यातील सर्व विक्रीकर सहआयुक्त.
३) विक्रीकर सहआयुक्त (महाविकास) [ विक्रीकर विभागाच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक अपलोड करण्यासाठी ]
४) महाराष्ट्र राज्यातील सर्व विक्रीकर उपआयुक्त.
५) महाराष्ट्र राज्यातील सर्व सहायक विक्रीकर आयुक्त.
६) महाराष्ट्र राज्यातील सर्व विक्रीकर अधिकारी.
७) उपसचिव, उद्योग १०, मंत्रालय, मुंबई.
८) उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) लेखा अधिकारी, विक्रीकर महसूल लेखा परिक्षण, मुंबई आणि नागपूर.
१२) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील सर्व कार्यासन व कार्यासन अधिकारी यांना प्रत.

दिनांक ; - २०/०९/२०१६ .

ठिकाण - मुंबई

विक्रीकर ~~सह~~आयुक्त (मुख्या -२)

महाराष्ट्र राज्य